# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

(सेंट्रल प्रोव्हिन्सेस शासन, शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगष्ट, १९२३ व्दारा स्थापित, व महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ व्दारा संचालित राज्य विद्यापीठ )

## महाविद्यालयीन शाखा

छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, रविंद्रनाथ टागोर मार्ग, नागपुर–४४० ००१, दुरध्वनी क्रमांक: ०७१२–२५२९९३२

फॅक्स नं. ०७१२–२५५५७०१, Email ID : ar-cs@nagpuruniversity.org

क्र.म.वि.२३४, दि. १८/६/२०१२.

प्रती,

प्राचार्य,
सर्व संलग्नीत महाविद्यालये,
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ,नागपूर

**विषय :– सत्र २०१३–१४ करीता निरंतर संलग्नीकरणाची प्रक्रिया ऑनलाईन करण्याबाबत.**

संदर्भ :– या विभागाचे पत्र क्र. म.वि./सी.एस./४५, दिनांक १६.३.२०१२.

महोदय,

आपणांस यापुर्वी संदर्भाकींत पत्रान्वये सूचित केल्यानुसार सत्र २०१३–१४ चे निरंतर संलग्नीकरणाची प्रक्रिया विद्यापीठाव्दारे ऑनलाईन करण्याकरीता वेळापत्रक निश्चित करण्यात आले असुन त्याकरीता आपणांस रु. १६०० /– प्रोसेसिंग फी विद्यापीठाच्या लेखा विभागात जमा करुन त्याची पावती महाविद्यालयीन शाखेकडे सादर करावयाची आहे. सदर पावती सादर केल्यानंतर आपणांस USER ID व Password प्रदान करण्यात येईल. USER ID व Password प्राप्त झाल्यानंतर आपणांस www.onlinebcudrtmnu.org या संकेतस्थळावर स्थानिय चौकशी समिति गठीत करण्यापुर्वी आवश्यक असलेली सर्व माहिती ( Pre LEC Information ) ऑनलाईन दिनांक १५ जुलै ते ३० जुलै, २०१२ पर्यंत सादर करावयाची आहे. त्यानंतर संकेतस्थळावर उपलब्ध होणारा निरंतर संलग्नीकरण अर्ज दिनांक ३१ ऑगष्ट, २०१२ पर्यंत ऑनलाईन सादर करणे आवश्यक राहील. त्यासोबत आवश्यक असलेली कागदपत्रे देखील अपलोड करणे आवश्यक आहे. आपण ऑनलाईन सादर केलेल्या अर्जाचे प्रिन्ट आउट घेवुन महाविद्यालयीन शाखेत निरंतर संलग्नीकरण शुल्क भरल्याच्या पावतीसह प्रत्यक्ष १० प्रतीत दिनांक ५ सप्टेंबर , २०१२ पर्यंत सादर करणे आवश्यक राहील.

वरील सर्व प्रक्रियेसाठी निश्चित केलेले वेळापत्रक व इतर सर्व माहिती www.onlinebcudrtmnu.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

जे महाविद्यालय ऑनलाइन अर्ज सादर करणार नाहीत त्यांचे निरंतर संलग्नीकरणाचे प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाही व अशी सर्व महाविद्यालये नियमानुसार दंडाकरीता पात्र राहतील व त्यांचे परीक्षा अर्ज, नामांकन अर्ज इत्यादी विद्यापीठाव्दारे स्विकारले जाणार नाहीत. करीता आपणांस विनंती करण्यात येते की, वरीलप्रमाणे करण्यात येणाऱ्या प्रक्रियेला सहकार्य करावे. निरंतर संलग्नीकरणासाठी यापुढे विद्यापीठाव्दारे करण्यात येणारा पत्रव्यवहार वरील संकेतस्थळावरच उपलब्ध राहील. त्यामुळे प्रत्येक महाविद्यालयाने दररोज संकेतस्थळावर माहिती तपासणे बंधनकारक राहील पोस्टाव्दारे कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

कळावे.

आपला

(डॉ.अ.दौ.चौधरी)
संचालक (म.वि.वि.मं.)
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज,नागपूर विद्यापीठ

प्रतिलीपी माहितीकरीता,

१. मा.परीक्षा नियंत्रक
२. उपकुलसचिव, परीक्षा पुर्व
३. सहायक कुलसचिव, सामान्य परीक्षा
४. सहायक कुलसचिव, व्यावसायिक परीक्षा
५. सहायक कुलसचिव, सामान्य परीक्षा व चौकशी

} राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर